(1)

जा.क्र.उमाशि-२/शि.मा./पुवि/२०१३-१४/
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 18 DEC 2013

प्रति

प्राचार्य/प्राचार्या,
उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे / सोलापूर / अहमदनगर.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१३-१४ अथवा त्या पूर्वी कनिष्ठ महाविद्यालयात नियुक्त केलेले शिक्षक / शिक्षण सेवक, शिक्षकेतर कर्मचारी नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत.**

**संदर्भ :**
१) शा. नि. क्र. संकीर्ण-१०९९/(२५५/९९)/माशि-२ दिनांक ६/९/१९९९
२) शा. नि. क्र. एसएसएन-१००७/(३६/०७)/माशि-२ दि. ६/२/२०१२
३) शा. नि. क्र. संकिर्ण -२०१२/(२०९/१२)/प्राशि -३ दि. ६/९/२०१२
४) मा. शिक्षण संचालनालयाकडील क्रं. एचएससी/१५२०११/३१५५४/१२एचएस /३०४८ दिनांक २५/३/२०१२
५) शा. नि. क्र. एसएसएन-१००८/(२००/०८)माशि-२ दिनांक २३/१०/२०१३

वरील संदर्भ क्रं. ३ च्या शासन निर्णयानुसार दिनांक २/५/२०१२ नंतर भरती प्रक्रियेस बंदी आहे.तत्पूर्वी सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षात दिनांक १/१२/२०११ ते २१/१२/२०११ व दिनांक ७/३/२०१२ ते २०/३/२०१२ या कालावधीत दोन शिक्षक मान्यता शिबिरे आयोजित करण्यात आली होती.

सदर दोन्ही शिबीरांमध्ये सादर केलेल्या एकुण ४५४ प्रस्तावांवर कार्यवाही होवून त्यातील ५३ प्रस्तावांना आक्षेप / त्रृटी कळविण्यात आल्या होत्या. दिनांक २ मे २०१२ नंतर भरतीस बंदी असल्याने फक्त या आक्षेप / त्रृटींची पूर्तता करण्यात येवून त्यांना मान्यता देण्याबाबतचे शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. त्या ५३ कनिष्ठ महाविद्यालयांची यादी सोबत लावलेली आहे.

अशा प्रकारे त्रृटी / आक्षेप लावलेल्या प्रस्तावांवर मान्यतेबाबतची कार्यवाही मान्यता शिबिरात होणार आहे. शासन निर्णय दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचना व विहित प्रपत्रानुसारच बिनचूक व स्वयंपूर्ण प्रस्ताव मान्यता शिबीरात सादर करावेत. प्रस्तावासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती संबंधित प्राचार्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे व नस्तीतील कागदपत्रांना पृष्ठक्रमांक देऊन अनुक्रमणिका जोडणे आवश्यक आहे. प्रस्तावासोबत प्राचार्यांनी संस्था / कनिष्ठ महाविद्यालयात कोणतेही न्यायालयीन प्रकरण चालू नाही किंवा अनुकंपा तत्त्वावरील प्रस्ताव प्रलंबीत नाहीत अशा प्रकारचे प्रमाणपत्र संबंधित प्राचर्यांनी देणे आवश्यक आहे. आपणास कळविणेत येणाऱ्या वेळापत्रकाप्रमाणे तसेच आपल्या जिल्हयास दिलेल्या फाईल्सच्या रंगाप्रमाणे प्रस्ताव मान्यता शिबीरात सादर करावेत. अपूर्ण प्रस्ताव सादर केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांवर राहील व विलंबास त्यांना वैयक्तिक जबाबदार धरले जाईल याची नोंद घ्यावी.

सोबत :- प्रस्तावासोबत प्राचार्यांनी सादर करावयाचे 'प्रमाणपत्र' नमूना जोडला आहे.

संदर्भीय शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पहावायास मिळतील.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत - १. मा. शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक )
शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत - २. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर
/- यांनी शिबीराचे वेळापत्रक व ठळक मुद्दे या बाबींना आपल्या जिल्हयांच्या स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.
२. प्राचार्य , पुना कॉलेज मोदीखाना पुणे-१
३ प्राचार्य, ह. दे. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर
/- आपण शिक्षक मान्यता शिबीराच्या वेळी आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.

# शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पुणे विभागातील शिक्षक / शिक्षकेतर / शिक्षणसेवक मान्यता शिबीराचे

## वेळापत्रक

**वेळ :- सकाळी १० ते दुपारी २.००** **दुपारी २.३० ते ५.४५**

| अ. क्र. | दिनांक | तालुके | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | २३/१२/२०१३ | अहमदनगर जिल्हा | पुना कॉलेज न्यू मोदी खाना पुणे |
| २ | २४/१२/२०१३ | अहमदनगर जिल्हा | |
| ३ | २७/१२/२०१३ | सोलापूर जिल्हा | **ह. दे. प्रशाला ज्युनि कॉलेज, सोलापूर** |
| ४ | २८/१२/२०१३ | सोलापूर जिल्हा | |
| ५ | ३०/१२/२०१३ | पुणे जिल्हा | पुना कॉलेज न्यू मोदी खाना पुणे |
| ६ | ३१/१२/२०१३ | पुणे जिल्हा | |

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वैयक्तिक मान्यता प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रांनुसार सर्व माहिती बरोबर आहे.

१. संस्था / कनिष्ठ महाविद्यालयात कोणत्याही प्रकारचे प्रकरण न्यायप्रविष्ठ नाहीत

२. संस्था / कनिष्ठ महाविद्यालयाचे स्तरावर कोणत्याही प्रकारच्या तक्रारी नाही.

३. संस्था / कनिष्ठ महाविद्यालयाने अनुकंपा तत्वावरील कोणतेही प्रकरण प्रलंबीत नाही.

४. संस्था / कनिष्ठ महाविद्यालयाने अपंग आरक्षण पूर्ण भरलेले आहे.

५. मागासवर्गीय अनुशेष पूर्ण भरलेले असून रोस्टर (१०० बींदू नामावली आयुक्त, (मागासवर्गीय कक्ष) यांच्याकडून तपासून सादर केलेली आहे.

**दिनांक :** **संस्था / सचिव** **मुख्याध्यापक / प्राचार्य**

# वैयक्तिक मान्यता प्रस्ताव तयार करतांना घ्यावयाची काळजी याबाबत सूचना

**शासन निर्णय क्रं. एसएसएन-१००७/(३६/०७)/माशि-२ दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ सोबतचे विहित प्रपत्र - "अ" पूर्ण भरुन प्रस्तावासोबत सादर करावयाचे आहे. विहित प्रपत्र प्रस्तावासोबत सदर न केल्यास प्रस्ताव स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

**अ) कार्यभार निश्चितीनंतर पद अतिरिक्त करणे.**

कमी प्रवेश / तुकडी बंद होणे / विषय बंद होणे इ. मुळे कार्यभार कमी होणे व परिणामी शिक्षक अतिरिक्त होत असल्यास पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. विषयनिहाय शिक्षकांची सेवाजेष्ठता विचारात घ्यावी. मागासवर्गीय प्रमाण विचारात घेऊन महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक २६ व २७ नुसार अतिरिक्त शिक्षकांचे नाव घोषित करावे.

२. अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांचे समावेशन प्रथम संस्थांतर्गत करण्याचा प्रयत्न करावा. संस्थांतर्गत समावेश शक्य नसल्यास अतिरिक्त शिक्षकांचे नांव, विषय इ. तपशिल शिक्षण उपसंचालक कार्यालयास कळवावा.

**३. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे नांव १५ जुलै पूर्वी शिक्षण उपसंचालक कार्यालयास कळविणे आवश्यक असते. अशा अतिरिक्त शिक्षकांची नावे मुदतीत न कळविले नसल्यास सदर शिक्षकांच्या वेतनाची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.**

४. अतिरिक्त शिक्षकांबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही न झाल्यास संबंधित शिक्षकांचे वेतन संस्थेच्या वेतनेतर अनुदानातून वसूल करण्यात येईल.

५. अतिरिक्त शिक्षकांचे नाव या कार्यालयास कळविल्यानंतर संबंधित शिक्षकांचे वेतन त्यांचे समावेश पूर्ण होईपर्यंत मूळ आस्थापनेवरुनच अदा होईल याची नोंद घ्यावी.

**विभाग - २ शिक्षक / शिक्षण सेवक नियुक्ती मान्यता.**

**१) सर्वसाधारण सूचना.**

- **रजा कालावधीतील नियुक्ती, बदलीने नियुक्ती आणि तक्ता अ मध्ये शिक्षण सेवक कालावधी पूर्ण झाल्याने नियमित वेतनश्रेणी मान्यता हया कार्यालयाच्या स्तरावर दिल्या जातील. तरी सदरचे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत शिबीरात सादर करण्यात येवू नयेत. याची नोंद घ्यावी.**
- इतर सर्व प्रकारचे मान्यता प्रस्ताव केवळ मान्यता शिबीरात स्विकारले जातील व त्यावरील निर्णय शिबीरात देण्यात येईल. शिक्षक/शिक्षण सेवक व शिक्षकेतर मान्यता प्रस्तावाबाबत कार्यालयाशी केलेला पत्रव्यवहार विचारत घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
- मान्यता घेण्याकरिता संबंधित प्राचार्य अथवा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख अथवा व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांनीच प्रस्तावाचा पूर्ण अभ्यास करुन शिबीरास उपस्थित रहावे. संबंधित शिक्षकास पाठवू नये अथवा सोबत आणू नये.
- एखादी नियुक्ती एखाद्या कारणास्तव अमान्य केली असल्यास त्या-त्या कारणांची रितसर पूर्तता झालेनंतरच परिपूर्ण प्रस्ताव मान्यतेसाठी पुढील शिबीरात फेरसादर करावा. आक्षेपांची / त्रुटींची पूर्तता न करताच अपूर्ण प्रस्ताव सादर करण्याचे टाळावे.
- संस्था अल्पसंख्यांक/अल्पभाषिक म्हणून नोंदविली असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करावे.
- नियुक्ती सेवासमाप्ती प्रकरणी न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करावी. न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- सर्व नियुक्त्या शाळा समिती अथवा समन्वय समितीने करणे आवश्यक आहे व याबाबातचा ठराव सचिवाचे / प्राचार्यांचे सहीने सादर करावा.
- शासन निर्णय दिनांक २६.४.२००६ मधील तरतुदीनुसार अंशतः अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित कार्यभारावरील पूर्ण वेळ / अर्धवेळ नियुक्ती ही वेतन श्रेणीतील राहील अशा शाळांतील पदांना शिक्षण सेवक योजना लागू राहणार नाही.

**२) कार्यभार वाढत असल्यास अथवा पद निर्माण होत असल्यास.**

- कार्यभार निश्चिती नंतर मंजूर पदांपैकी सेवानिवृत्ती, मृत्यू, राजीनामा इ. कारणामुळे रिक्त होणारे पद भरण्यापूर्वी त्या विषयाच्या अतिरिक्त शिक्षकांची मागणी शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे करावी या कार्यालयाकडे अतिरिक्त शिक्षक उपलब्ध असलीत तर अशा शिक्षकांचे समावेशनाचे आदेश निर्गमित केले जातील. अन्यथा ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाईल.
- अतिरिक्त शिक्षकांबाबात शिक्षण उपसंचालकांचे समावेशनाचे आदेश दिले गेल्यानंतर संबंधित अतिरिक्त कर्मचाऱ्यास सेवेत सामावून घेणे संबंधित संस्थेस बंधनकारक आहे असे समावेशन न केल्यास संस्थेचे संबंधित पद रद्द करण्याची कार्यवाही शिक्षण उपसंचालक करु शकतील.

- अतिरिक्त शिक्षकांच्या समावेशनामुळे त्यांची सेवाजेष्ठता नवीन संस्थेत नव्याने सुरु होईल मात्र त्यांची शिल्लक रजा वेतनवाढी अथवा अन्य सेवाविषयक फायदे अबाधित राहतील अशा कर्मचाऱ्यांचा कायम सेवक हा दर्जा कायम राहील.
- मूळ संस्थेत नवीन पद निर्माण झाल्यास त्या पदावर सर्व प्रथम पूर्वी अन्यत्र समावेशन झालेल्या अतिरिक्त शिक्षकांचा हक्क राहील व त्याची इच्छा नसल्यास ते पद भरण्यासाठी परिच्छेद ५ अनुसार कार्यवाही करता येईल.
- रिक्त पद भरण्यास अतिरिक्त शिक्षक उपलब्ध नसल्याचे प्रमाणपत्र शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावे व नंतर नवीन पद भरण्याची प्रक्रिया पुढीलप्रमाणे करता येईल. ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय भरलेल्या पदाला मान्यता मिळणार नाही.

**३) शिक्षण सेवक नियुक्ती मान्यता.**

- उच्च माध्यमिक अनुदानित शाळेत कनिष्ठ महाविद्यालयामध्ये निर्माण व रिक्त होणारे प्रत्येक पूर्णवेळ पद जाती संवर्गानुसार परिविक्षाधीन कालावधीसाठी भरणे आवश्यक आहे. शिक्षण सेवक योजनानुसार प्रत्येक पूर्णवेळ पद ३ वर्षाकरिता भरणे आवश्यक आहे. संदर्भ अधिनियम ७७ कलम ५ (२) शासन निर्णय १३.१०.२०००)
- तात्पुरत्या स्वरुपातील रिक्त पद निश्चित कालावधी नमूद करुन (उदा. रजा कालावधी) भरणे आवश्यक आहे.
- प्रत्येक विषय शिक्षकास विद्यार्थी संख्या विचारात घेऊन दर आठवड्यास १७ ते १९ घड्याळी तासापर्यंत कार्यभार देता येईल. (संदर्भ म. खा. शा. कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. २१)
- प्रत्येक रिक्त पद विहित निवड पध्दतीचा अवलंब करुन भरल्यास या कार्यालयाने त्यानंतर आयोजित केलेल्या मान्यता शिबीरात मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे बंधनकारक आहे.

**४) रिक्त पद भरण्याची कार्यवाही.**

- रिक्त पद / नविन पद भरण्यापूर्वी सदर पद आरक्षित आहे किंवा कसे हे ठरवावे.
- सदर पद आरक्षित असल्यास ते भरण्याकरिता व्यापक प्रसिध्दीच्या वर्तमानपत्रात जाहिरात द्यावी. जाहिरातीमध्ये पुढील तपशील असावा. (मोफत जाहिरात असू नये.)
  अ) पद राखीव अगर कसे.
  ब) पदांची आरक्षणानुसार संख्या
  क) पदांची अर्हता विषय इ.
  ड) आरक्षण एकूण पदांना लागू करावे विषयनिहाय आरक्षण निश्चित करता येणार नाही.
  इ) अर्ज करण्याबाबत सविस्तर तपशील (अर्जाचा नमूना इत्यादी)
  फ) अर्धवेळ / पूर्णवेळ वेतनश्रेणी /मानधन इ. बाबत तपशील.
- अर्ज करण्याची मुदत मुलाखतीची निमंत्रणपत्रे, मुलाखतीचे रेकॉर्ड नेमणूक पत्रे, रुजू होणेबाबत मुदत, पत्रव्यवहार याबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.
- मागासवर्गीय उमेदवाराच्या उपलब्धतेसाठी पुढील कार्यालयाकडे प्रतिक्षा यादीची मागणी करण्यात यावी.
  अ) जिल्हा समाजकल्याण कार्यालय.
  ब) आदिवासी विकास विभाग
  क) जिल्हा सेवायोजन कार्यालय
  ड) विद्यापीठ सेवायोजन कार्यालय.

  वरील कार्यालयांकडून प्रशिक्षित (अनुसूचित जाती / जमाती / वि. जा. भ. ज.) उमेदवार उपलब्ध झाले नाहीत. तर त्याच संवर्गातील उमेदवारांची नावे मागवावीत व त्यापैकी उमेदवारांची गुणवत्तेनुसार नियुक्ती करण्यात यावी. कालापव्यय टाळण्यासाठी मागणीपत्रात प्रशिक्षित उमेदवारांची मागणी करणे आवश्यक आहे. तसा उल्लेख जाहिरातीतही करणे आवश्यक आहे. (संदर्भ शासन निर्णय एसएसएन-१०९९/(३४०/९९)/माशि-२, दिनांक १३ ऑक्टोंबर, २०००)
- शासन निर्णय दिनांक १३.१०.२००० अन्वये जून २००० पासून अनुदानित मधील रिक्त होणारे पद शिक्षण सेवक म्हणून भरावयाचे आहे. त्याकरिता सदर पद राखीव अथवा बिगर राखीव हे निश्चित करणे आवश्यक आहे.
- शासन निर्णय दिनांक १५/९/२०११ नुसार प्राथमिक मधून उच्च माध्यमिक मध्ये प्राथमिक शिक्षकाची नियुक्ती केली असल्यास सदर नियुक्ती मागासवर्गीय अनुशेषा प्रमाणे असणे आवश्यक आहे.
- शासन निर्णय दिनांक १५/९/२०११ नुसार एकाच संस्थेतील माध्यमिक शिक्षकाची नियुक्ती माध्यमिक मधून उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयात केली असल्यास, अशा नियुक्त शिक्षकाची पूर्वीच्या बिंदू नामावलीनुसार झालेली असल्यामुळे मागासवर्गीय अनुशेषाची आवश्यकता नाही.

  तथापि वेगवेगळया संस्थेतून वरील प्रमाणे माध्यमिक कडून उच्च माध्यमिक कडे शिक्षकाची नियुक्ती केल्यास सदर नियुक्ती मागासवर्गीय अनुशेषा प्रमाणे असणे आवश्यक आहे.

- आरक्षण ठरविण्यासाठी सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, आयुक्त कार्यालय यांनी तपासून प्रमाणित केलेले मागासवर्गीयांचे प्रमाण दर्शविणारे कागदपत्रे सादर करावीत. सहाय्यक आयुक्त यांनी प्रमाणित केलेल्या तारखेनंतरचे रिक्त होणाऱ्या पदांचा व नेमणूकांचा तपशील सादर करणे आवश्यक आहे. या तपशीलानुसार अद्ययावत रोस्टर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून तपासून सादर करणे आवश्यक आहे.
- कोणत्याही परिस्थितीत मागासवर्गीय राखीव पदावर बिगर मागास उमेदवारांची नियुक्ती करता येणार नाही व त्याची मान्यताही मिळणार नाही. अशा शिक्षकांच्या वेतनाची जबाबदारी पूर्णपणे संस्थेची राहील याची नियुक्ती करतांना दक्षता घ्यावी.
- शासन निर्णय दिनांक १५.९.२०११ नुसार प्राथमिक, माध्यमिक मधील नियमित शिक्षकांची प्राथमिक मधून, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक अथवा माध्यमिक मधून उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात अशा वेगळया पदावर नियुक्ती झाल्यास वेतनास संरक्षण राहणार नाही. मात्र संबंधित कर्मचा-याची तत्पूर्वीची सेवा सेवानिवृत्तीवेतनासाठी ग्राहय राहील.

  वरीलप्रमाणे प्राथमिक मधून माध्यमिक अथवा माध्यमिक मधून उच्च माध्यमिक कडे नियुक्ती झाल्यास त्याप्रमाणे संस्था ठरावामध्ये संबंधित शिक्षकांच्या माध्यमिक कडील वेतनास संरक्षणास राहणार नाही याचा स्पष्ट उल्लेख असावा. त्याचप्रमाणे त्यांच्या नियुक्ती पत्रातसुध्दा त्यांच्या माध्यमिक कडील वेतनास संरक्षण राहणार नसल्याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.

  **अशा प्रकारे नियुक्ती झालेल्या शिक्षकास या कार्यालयाची शिक्षक मान्यता मिळाल्यानंतर त्याच्या माध्यमिक कडील वेतनास संरक्षण नसल्याबाबत त्याच्या मूळ सेवापुस्तकात नोंद करावी.**

**५) नियुक्त केलेल्या शिक्षकांचे / शिक्षण सेवकांचे मान्यता प्रस्ताव.**

सर्वसाधारणपणे कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये पुढील प्रकारच्या नियुक्त्या केल्या जातात. प्रस्तावासोबत सादर करावयांच्या कागपत्रांची सूची खाली देण्यात येत आहे.

**अ) रिक्त पदी नियुक्ती**

- पद कशामुळे व केव्हापासून निर्माण झाले त्याचा तपशील
- जाहिरात
- सेवक संच निश्चिती पत्र
- मागासवर्गीय उमेदवार प्राप्त करुन घेण्यासाठी संस्थेने केलेले प्रयत्न
- संबंधित कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या याद्या
- शाळा समिती अथवा समन्वय समितीचा ठराव
- मुलाखतीच्या याद्या
- मागासवर्गीय प्रमाण दर्शविणारा तक्ता (सहा. आयुक्त मागासवर्गीय कक्ष यांनी प्रमाणित केलेला)
- नेमणूक आदेशातील सर्व रकाने भरलेले (सक्षम प्राधिकारी यांच्या सही शिक्क्याचे)

  अ) नेमणूकीचा तपशील स्पष्ट असावा.

  ब) महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ क्र. ९ (५) पहावा. अनुसूची-ड

  शासन निर्णय दि. १३.१०.२००० मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश व हमीपत्र नेमणूक पत्रात कोणताही बदल अथवा जादा अटींचा समावेश करता येणार नाही अथवा संशयास्पद खाडाखोडी करता येणार नाही.

  नेमणूकीच्या बाबतीत सक्षम अधिकारी मुख्याध्यापकांखेरीज इतरांच्या बाबतीत सचिव शाळा समिती मुख्याध्यापक समन्वयक समिती यांना स्वाक्षरी केलेले असावे. मुख्याध्यापकांचे बाबतीत संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम प्राधिकारी असतील.
- संबंधितांच्या स्वाक्षरीचा रुजू अहवाल
- अर्हता प्रमाणपत्राच्या सांक्षांकित छायाप्रती
- शाळा सोडल्याचा दाखला / एस. एस. सी. प्रमाणपत्र छायाप्रत
- मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत नियुक्तीचे वेळी जातीचा सक्षम प्राधिकारी यांचा दाखला व जात पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. जातपडताळणी वैधता प्रमाणपत्राशिवाय नियुक्ती मान्य करता येणार नाही याची दक्षता घ्यावी.
- संस्थेने नियुक्त केलेल्या शिक्षकाची नियुक्ती ही संस्थेच्या अधिकृत संचालक मंडळाने केली असल्याबाबत चे प्रमाणपत्र संबंधित प्राचार्यांनी प्रस्तावासोबत सादर करावे. (संस्थेचा अलिकडील काळातील बदल अहवाल (**Change Report**) सादर करावा.)

  नियुक्ती मान्यतेनंतर संबंधित शिक्षकांच्या नियुक्तीबाबत संघटना अथवा इतर व्यक्ती यांचेकडून सदर शिक्षकांच्या नियुक्ती बाबत तक्रारी अथवा न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील याचा उल्लेख सदर प्रमाणपत्रात स्पष्टपणे केलेला असावा.

**ब) अर्धवेळ कार्यभार नियुक्ती.**

- पद कशामुळे व केव्हापासून रिक्त झाले त्याचा तपशील-
- किमान ९ घड्याळी तास कार्यभाराकरिता अर्धवेळ शिक्षक / शिक्षण सेवकांची नियुक्ती पदाच्या मान्यतेनुसार करता येईल.
- पूर्वीच्या मान्यताप्राप्त अर्धवेळ वेतन श्रेणीतील शिक्षकांना जोडपत्र ड मधील नमून्यात वेतन श्रेणीत नेमणूक पत्र. शिक्षण सेवकास शासन निर्णय दिनांक १३.१०.२००० मधील तरतूदीनुसार नियुक्ती पत्र व अ. क्र. ७ ते १० मधील संबंधित कागदपत्रे.

  शासन परिपत्रक दिनांक ३१.१.२००१ नुसार अर्धवेळ शिक्षकांनी शैक्षणिक अर्हता वाढविली अथवा तुकडी अनुदान प्राप्त झालेमुळे कार्यभार वाढला तर सरसकट त्या शिक्षकाला पूर्णवेळ नेमणूक देता येणार नाही. संस्थेमधील मागासवर्गीय पदांचा अनुशेष विचारात घ्यावा लागेल.

**क) रजा कालावधीतील नियुक्ती.** (सर्वसाधारण सूचना क्रं. १ पहावे)

- रजा कालावधीतील नियुक्ती तीन महिन्यापेक्षा जास्त असल्यास निवड पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.
- रजेवर जाणाऱ्या शिक्षकांचा अर्ज
- रजा मंजूरीचा सक्षम समितीचा ठराव व रजा मंजूरी आदेश
- रजा कालावधीत नियुक्त केलेला शिक्षकांचा अर्ज व सक्षम समितीचा ठराव
- इ. ११ व १२ वी मधील बोर्डाच्या परीक्षा कालावधी कार्यभार विचारात घ्यावा.
- रजा कालावधीत नियुक्ती देतांना कार्यभार व दीर्घ सुट्या (दिपावली, उन्हाळी इ.) यांचाही विचार करण्यात यावा व अ. क्र. ३.१ मधील अ. क्र. ६ ते १० मधील संबंधित कागदपत्रे.
- रजा मंजूरी नोंद केलेल्या सेवा पुस्तकातील पानांची छायांकित प्रत.

**ड) बदलीने नियुक्ती.** (सर्वसाधारण सूचना क्रं. १ पहावे)

एकाच संस्थेच्या एकापेक्षा जास्त उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये असतील तर पूर्णवेळ कार्यभाराच्या पदांवर कायम मान्यताप्राप्त शिक्षकांच्या बदल्या महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. ४१ च्या अधिन राहून करता येतील. सदरचे बंधन संस्थेने पाळणे आवश्यक आहे. सर्व बदल्यांना मान्यता घेणे बंधनकारक आहे.

**बदलून आलेल्या कर्मचाऱ्याच्या मान्यतेसाठी खालील कागदपत्रे सादर करावीत.**

- संस्थेकडील बदली आदेश
- रुजू अहवाल
- मूळ नेमणूकीस मान्यता असलेल्या पत्राची प्रत
- बदलून आलेल्या शाळेतील विहित नमून्यातील सेवामुक्ती प्रमाणपत्र

**इ) घड्याळी तास तत्वावरील नेमणूका**

- नेमणूक आदेश (जोडपत्र ड)
- रुजू अहवाल
- अर्हता प्रमाणपत्र
- संस्था ठराव

**ई) माध्यमिक शिक्षकास उच्च माध्यमिक कार्यभार अध्यापनासाठी नेमणूक**

- नेमणूक आदेश
- रुजू अहवाल
- अर्हता प्रमाणपत्र
- मूळ पदास मान्यता असलेबाबत संबंधित शिक्षणाधिकारी यांच्या मान्यता आदेशाची प्रत.
- सद्यपरिस्थितीत सहाव्या वेतन आयोगामध्ये विशेष वेतनाचा उल्लेख नाही त्यामुळे फक्त कार्यभार अध्यापनासाठी मान्य करता येईल.

**फ) तक्ता अ मध्ये मान्यता.** (सर्वसाधारण सूचना क्रं. १ पहावे)

यापूर्वी या कार्यालयाकडून परिविक्षाधिन अथवा पूर्णवेळ शिक्षण सेवक नियुक्ती मान्यता केली असेल व त्यांचा कालावधी समाप्त झालेला असेल व त्यांचे सदर कालावधीतील काम समाधानकारक असेल अशा शिक्षक / शिक्षण सेवकांचा तक्ता अ मध्ये मान्यतेसाठी खालील कागदपत्रे सादर करावी.

- मूळ नियुक्ती आदेश

- या कार्यालयाची मान्यता प्रत
- संस्था ठराव
- त्यांनी उपभोगलेल्या किरकोळ रजा तसेच अन्य रजेचा तपशील
- ठरावात नाव, नेमणूक दिनांक
- कामकाज समाधानकारक असल्याबाबतचे मुख्याध्यापकांचे / प्राचार्यांचे पत्र
- गोपनीय अहवाल तीन वर्षांचा
- शिक्षण सेवक कालावधी पूर्ण झालेनंतर अनुसूची ड मधील नमून्यात वेतन श्रेणीत नियुक्ती पत्र सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने देणे आवश्यक आहे.

सर्व प्रमाणपत्राच्या प्रती सांक्षांकित करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

**ग) पदोन्नतीने नियुक्ती बदली.**

उपमुख्याध्यापक, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर यांना पदोन्नती देतांना महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेऊन कार्यवाही करावी.

वरील मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करुन शिक्षक मान्यता प्रस्ताव सादर करणेबाबत परिपूर्ण माहिती सादर करुन वेळीच मान्यता घेण्यात याव्यात. याबाबत कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करुन नये.

प्रस्तावाच्या मुख्य पत्रात प्रस्तावाचा सारांश क्रमाने येणे आवश्यक आहे. शिक्षक मान्यता नस्तीस पृष्ठ क्र. देऊन त्यांची अनुक्रमणिका असणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्रं. एसएसएन-१००७/(३६/०७)/माशि-२ दिनांक ६ फेब्रुवारी २०१२ सोबतचे प्रपत्र

## प्रपत्र – "अ"

### वैयक्तिक मान्यता देतांना तपासावयाच्या बाबी

**नियुक्त कर्मचा-याचे नांव :-**

**पदनाम :-**

| अ.क्रं. | तपशील | संस्थेने भरावयाची माहिती. |
|---|---|---|
| १ | पद रिक्त / निर्मिती होण्याचे कारण :- कर्मचा-याच्या नावासह (सेवानिवृत्ती / राजीनामा / मृत्यु / रजा /वाढीव पद व इतर) (राजीनाम्यामुळे पद रिक्त झाल्यास राजीनाम्याची प्रत व तो मंजूर केल्याचा संस्थेचा ठराव प्रत सोबत जोडावी) | |
| २ | (अ) पदाचा तपशील (संच मान्यतेनुसार मान्य / प्रस्तावीत वाढीव पद) प्रत जोडली आहे/नाही असल्यास पृष्ठ क्रमांक | |
| | (ब) पदाचा तपशील (पूर्ण वेळ / अर्धवेळ / अंशकालीन (घडयाळी तास / रजा कालावधी (कालावधी व रजेवर गेलेल्या कर्मचा-याचे नांव नमूद करावे) | |
| | (क) पदाचा तपशील (अनुदानीत /अशतः अनुदानीत / विना अनुदानीत / कायम विना अनुदानीत | |
| ३ | प्रस्तावासोंबत सक्षम प्राधिका-यांकडून प्रमाणित केलेल्या बिंदू नामावली (रोस्टर) ची प्रत सोबत जोंडली आहे/नाही. असल्यास पृष्ठ क्रमांक. | |
| ४ | पदाचे मानधन / वेतनश्रेणी | |
| ५ | जाहिरातीचा दिनांक व वर्तमानपत्राचे नाव कात्रण जोडले आहे / नाही असल्यास पृष्ठ क्रमांक | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | शाळा समिती/समन्वय समितीचा ठराव जोडला आहे/नाही असल्यास पृष्ठ क्रमांक | | |
| ७ | निवड समितीचा अहवाल जोडला आहे/नाही असल्यास पृष्ठ क्रमांक | | |
| ८ | निवड झालेल्या कर्मचा-याचे नियुक्ती आदेश पृष्ठ क्रमांक (पोच असलेले) | | |
| | | **पदासाठी आवश्यक अटी व शर्ती** | **नियुक्त उमेदवाराची शैक्षणिक पात्रता व इतर बाबी** |
| ९ | संबंधित पदासाठी विहित वयोमर्यादा (किमान व कमाल) (खुला / मागास) | | |
| १० | पदासाठी विहित शैक्षणिक व व्यवसायिक अर्हता (विषय व माध्यम) | | |
| ११ | प्रवर्ग (वैधानिक)<br>(अ.जा., अ.ज.,वि.ता.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व., खुला | | |
| १२ | प्रवर्ग (सामाजिक ) समांतर<br>(दिनांक ७/११/२००९ च्या शासन निर्णयानुसार) | | |
| १३ | पदासाठी आवश्यक कार्यभार व नियुक्त कर्मचा-यास उपलब्ध कार्यभार<br>(विषय व माध्यम) | | |

**प्राचार्य / मुख्याध्यापकाची सही.**

# शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील कर्मचारी मान्यता शिबीरातील त्रृटी / आक्षेप लावलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांची यादी

| अ.क्रं. | जिल्हा | कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव | |
|---|---|---|---|
| १ | पुणे | नु.म.वि. मुलींची प्रशाला, पुणे ३० | |
| २ | पुणे | श्रीमती नथीबाई ठाकरसी कला व वाणिज्य महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे | |
| ३ | पुणे | प्राचार्य भारती विदयापीठ भारती विदयापीठ लालबहादूर शास्त्री मार्ग पुणे | |
| ४ | पुणे | लक्ष्मणराव आपटे प्रशाला पुणे | |
| ५ | पुणे | जवाहरलाल माध्य विदयालय क म वि केडगाव ता दौड जि पुणे | |
| ६ | पुणे | जोगेश्वरी माध्य व उ मा वि वाडे वोल्डाई ता हवेली पुणे | |
| ७ | पुणे | शिवशंकर कनिष्ठ महाविदयालय तळेबर ता आंबेगाव जि पुणे | |
| ८ | पुणे | सुंदरबाई राठी क म वि सेवासदन पुणे | |
| ९ | पुणे | गुरुवर्य स प सबनिस विदयामंदीर नरायणगाव जुन्नुर | |
| १० | पुणे | एस एम चोक्सी हायस्कूल ज्यूनिअर कॉल्ेज पुणे | |
| ११ | पुणे | विदयाधाम शास्त्र कनिष्ठ महाविदयालय शिरुर जि पुणे | |
| १२ | पुणे | एच व्ही दसोई कॉल्ेज ५९६ बुधवार पेठ पुणे -२ | |
| १३ | पुणे | ज्ञानमंदीर हायस्कूल व क म वि आले ता जुन्नर जि पुणे | |
| १४ | पुणे | प्रा श्री छत्रपती संभाजी हाय व ज्यू कॉलेज कोरगाव भिमा ता शिरुर जि पुणे | |
| १५ | पुणे | सचिव जनता शिक्षण संस्था दोपोडी पुणे | |
| १६ | पुणे | विदया विकास मंदीर माध्य व उच्च माध्य विदयालय अवसरी बु ता आबंगाव | |
| १७ | पुणे | मुगूटराव साहेबराव काकडे महा सोमेश्वरनगर ता बारामती | |
| १८ | पुणे | विदया भवन ज्यु कॉलेज पुणे | |
| १९ | पुणे | पुरंदर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज सासवड ता पंरुदर | |
| २० | पुणे | म. गांधी विदया व क म वि उरुळीकांचन ता हेवली जि पुणे | |
| २१ | पुणे | श्री वर्धमान विदयालय व क म वि वालचंदनगरी ता इंदापूर जि पुणे | |
| २२ | पुणे | श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, भोर, पुणे | |
| २३ | पुणे | सिम्बायोसिस कॉलेज, पुणे | |
| २४ | पुणे | कै सौ संदरबाई राठी हायस्कूल अॅन्ड ज्यु कॉल्ेज पुणे | |
| २५ | पुणे | विदयाधाम प्रशाला क म घोडनदी शिरुर जि पुण | |
| २६ | पुणे | मराठावाडा मित्रमंडळ ज्यू कॉल्ेज ऑफ कामर्स पुणे | |
| २७ | पुणे | श्री पळसनाथ माध्य व उच्च माध्यमिक विदयालय पळसदेव ता इंदापूर जि पुणे | |

| अ.क्रं. | जिल्हा | कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव | |
|---|---|---|---|
| २८ | सोलापूर | इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज, बेगमपूर, सोलापूर | |
| २९ | सोलापूर | डी. ए. व्ही. वेलणकर महाविद्यालय, सोलापूर | |
| ३० | सोलापूर | संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर | |
| ३१ | सोलापूर | म. गांधी माध्य व उच्च माध्य व मांत्रिक विद्यालय करमाळा, सोलापूर | |
| ३२ | सोलापूर | सांगोला विद्यामंदिर व क.म.वि सांगोला सोलापूर | |
| ३३ | सोलापूर | प पू उदयसिंहजी देशमुख तथा भैजू महाराज प्रशाला व कनिष्ठ महा.वाढेगाव ता सांगोला सोलापूर | |
| ३४ | सोलापूर | भैरवनाथ विदयालय कनिष्ठ महाविदयालय आलेगाव माढा सोलापूर | |
| ३५ | सोलापूर | कै .सो वत्सलादेवी देसाई विदयालय व कै अण्णा सो‍ा घुले जवळे सांगोला जि सोलापूर | |
| ३६ | सोलापूर | यशवंतराव चव्हाण महा करमाळा सोलापूर | |
| ३७ | सोलापूर | न्यू इंग्लिश स्कूल कनिष्ठ महा.सांगोला | |
| ३८ | सोलापूर | पुण्यश्लोक अहिल्यादेवी विदयामंदीर आणि पै. अे. सी हुडेकरी क महाविद्यलय सोलापूर | |
| ३९ | सोलापूर | श्री उत्तरेश्वर हाय व कनिष्ठ महाविदयालय केम ता करमाळा जि सोलापूर | |
| ४० | सोलापूर | सोंनद हायस्कूल व कनिष्ठ महाविदयालय सोनंद ता सांगोला जि सोलापूर | |
| ४१ | सोलापूर | इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज, मंगळवेढा, सोलापूर | |
| ४२ | सोलापूर | अहिल्याबाई प्रशाला ज्यू कॉलेज सोलापूर | |
| ४३ | सोलापूर | हलदहिवडी विद्यालय व ज्युनि. कॉलेज, सांगोला, जि. सोलापूर | |
| ४४ | सोलापूर | डी ए व्ही वेलणकर कॉलेज आर्फ कामर्स सोलापूर | |
| ४५ | सोलापूर | श्रीमान भाऊसो झाडबुके महाविदयालय बार्शी सोलापूर | |
| ४६ | अहमदनगर | राधाबाई काळे महाविदयालय अहमदनगर | |
| ४७ | अहमदनगर | कला व विज्ञान उच्च माध्य टाकळी खामगाव जि नगर | |
| ४८ | अहमदनगर | कला व विज्ञान उच्च माध्य टाकळी खामगाव जि नगर | |
| ४९ | अहमदनगर | अहमदनगर शिक्षण संस्था अहमदनगर | |
| ५० | अहमदनगर | प्राचार्य ज्ञानमाता विदयालय व जि अहमदनगर | |
| ५१ | अहमदनगर | भाउसाहेब फिरोदीपा हायस्कूल व क म वि अहमदनगर | |
| ५२ | अहमदनगर | जय बजरंग माध्य व उच्च माध्य पाईल लाईन रोड अहमदनगर | |
| ५३ | अहमदनगर | बाबुजी आव्हाड महाविदयालय पाथडी अहमदनगर | |
| ५४ | | विभागीय अधिकारी रयत शिक्षण संस्था सातारा | |